दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

9 पदकांसह पदकतालिकेत दिमाखदार कामगिरी

डकार (सेनेगल) : डकार येथे सुरू असलेल्या चौथ्या युवा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा 2026 मध्ये भारतीय युवा खेळाडूंनी दमदार कामगिरीची नोंद केली आहे. स्पर्धेच्या 12व्या दिवशी भारताने 1 सुवर्ण, 3 रौप्य आणि 5 कांस्य अशी एकूण 9 पदके जिंकत पदकतालिकेत 36वे स्थान पटकावले आहे. या स्पर्धेत 15 सुवर्णपदकांसह चीन अव्वल स्थानावर असून जपान दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारतासाठी सर्वात मोठा ऐतिहासिक क्षण बॉक्सिंग रिंगमध्ये पाहायला मिळाला.

अग्निवीरांना चार वर्षांच्या सेवेनंतर लग्नाची परवानगी

सशस्त्र दलांमध्ये सेवा देणाऱ्या अग्निवीरांसाठी केंद्र सरकारने सुधारित अग्निपथ योजनेत महत्त्वाचा बदल केला आहे. आता अग्निवीरांना चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर लग्न करण्याची परवानगी मिळणार आहे. यामध्ये गुणवत्तेच्या आधारावर कायमस्वरूपी सेवेसाठी निवड झालेल्या 25 टक्के अग्निवीरांचा तसेच दोन वर्षांची मुदतवाढ मिळालेल्या अग्निवीरांचाही समावेश असेल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १९९ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

विकासाच्या पुढील टप्प्याची तयारी

अहमदाबाद: अदाणी समूहाचा भाग असलेल्या आणि भारतातील आघाडीच्या बांधकाम साहित्य समाधान पुरवठादारांपैकी एक असलेल्या अंबुजा सिमेंट्स लिमिटेडने आपल्या विस्ताराच्या पुढील टप्प्याची निश्चित आखणी केली आहे. याअंतर्गत देशातील महत्त्वाच्या बाजारपेठांमध्ये नवीन ग्रीनफिल्ड आणि ब्राउनफिल्ड प्रकल्पांच्या माध्यमातून सुमारे 30 एमटीपीए सिमेंट उत्पादन क्षमता वाढविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या विस्तारामुळे कंपनीचे उत्पादन आणि वितरण जाळे पूर्व, पश्चिम आणि उत्तर भारतात अधिक मजबूत होणार आहे. सध्या कंपनीची देशभरातील 24 एकात्मिक उत्पादन प्रकल्प आणि 24 ग्राइंडिंग युनिट्सच्या माध्यमातून एकूण 113.5 एमटीपीएसिमेंट उत्पादन क्षमता आहे.

हायवे इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला 198.31 कोटी रुपयांचे कंत्राट

मुंबई - हायवे इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला सेंट्रल पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट कडून १९८.३१ कोटी रुपयांचे नागरी बांधकाम (सिव्हिल कन्स्ट्रक्शन) कंत्राट मिळाले आहे. हे कंत्राट मध्य प्रदेशातील सिहोर जिल्ह्यातील 'जामुनिया तलाव' गावात सीआयएसएफ च्या १२ व्या रिझर्व्ह बटालियनसाठी निवासी आणि अनिवासी पायाभूत सुविधांच्या विकासाशी संबंधित आहे.कंपनीच्या स्थापनेपासून मिळालेल्या सर्वात मोठ्या नागरी बांधकाम कंत्राटांपैकी हे एक असून, यात बटालियनच्या उभारणीच्या पहिल्या टप्प्यातील नियोजन, डिझाइन आणि बांधकामाचा समावेश आहे. हा प्रकल्प 'इंजिनिअरिंग, प्रोक्योरमेंट अँड कन्स्ट्रक्शन' मोड-१ अंतर्गत राबवला जाणार असून, तो पूर्ण करण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

साईदीप सह्याद्रि हॉस्पिटलची यशस्वी कामगिरी

अहिल्यानगर: मणिपाल हॉस्पिटल्सच्या नेटवर्कमधील साईदीप सह्याद्रि हॉस्पिटलने स्वादुपिंडातील खड्यांवर एक्स्ट्राकॉर्पोरियल शॉक वेव्ह लिथोट्रिप्सी (ईएसडब्ल्यूएल) ही उपचारपद्धती यशस्वीपणे वापरली आहे. अहिल्यानगरमध्ये या उपचारपद्धतीचा रुग्णावर प्रथमच वापर करण्यात आला. गेल्या दोन वर्षांहून अधिक काळ तीव्र पोटदुखीचा त्रास असलेल्या ४९ वर्षीय रुग्णावर ही उपचारपद्धती करण्यात आली. संबंधित रुग्णाला १२ ऑक्टोबर २०२६ रोजी तीव्र पोटदुखीचा त्रास होत असल्याने साईदीप सह्याद्रि हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. रुग्णाला क्रॉनिक कॅल्सिफिक पॅनक्रियाटायटिसचा त्रास होता. या आजारात स्वादुपिंडाला दीर्घकाळ सूज येते आणि स्वादुपिंडाच्या नलिकांमध्ये कॅल्शियमचे साठे तयार होऊन खडे निर्माण होतात.

काबुरकाला प्रकल्पाच्या एक्सप्लोरेशनसाठी महत्त्वाचा करार

पुणे: पुण्यातील रिअल इस्टेट क्षेत्रातील कंपनी एसबी रिअल्टी ने अभिनेता शरद केळकर यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. तसेच 'स्पेसेस दॅट ब्रीद' ही नवीन ब्रँड मोहीम सुरू केली आहे. नैसर्गिक प्रकाश, हवा खेळती राहणे, हरित परिसर आणि मोकळ्या जागा या संकल्पनांवर ही मोहीम आधारित आहे. घर किंवा कामाच्या ठिकाणाची रचना माणसांच्या दैनंदिन जीवनावर कसा परिणाम करते, तसेच त्यांना आराम करण्यासाठी आणि आपल्या जवळच्या व्यक्तिंसोबत वेळ घालवण्यासाठी कशी मदत करते, हे दाखवण्यात आले आहे. रिअल इस्टेट क्षेत्रातील सहा वर्षांहून अधिक अनुभव असलेल्या एसबी रिअल्टीने पुण्यात आतापर्यंत 10 लाख चौरस फुटांपेक्षा जास्त क्षेत्रफळाचे प्रकल्प पूर्ण केले आहेत. सध्या 20 लाख चौरस फुटांपेक्षा जास्त क्षेत्रफळाचे निवासी आणि व्यावसायिक प्रकल्पांचे बांधकाम सुरू आहेत, तर 50 लाख चौरस फुटांपेक्षा जास्त क्षेत्रफळाचे प्रकल्प आगामी काळात सुरू होणार आहेत.



जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांचा हल्ला, बेपत्ता झालेल्या दोन SPO जवानांचे मृतदेह आढळले

जम्मू : जम्मू-काश्मीरमधील किश्तवाड जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. बुधवारी बेपत्ता झालेल्या दोन स्पेशल पोलीस ऑफिसर (SPO) जवानांचे मृतदेह गुरुवारी दच्छन परिसरातील जंगलात आढळून आले. दोन्ही जवानांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून, हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा दलांकडून मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे.

जंगल परिसरात शोधमोहीम

बुधवारी किश्तवाड जिल्ह्यातील दच्छन परिसरातील उंच डोंगराळ आणि घनदाट जंगल असलेल्या भागातून दोन्ही SPO जवान बेपत्ता झाले होते. त्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा यंत्रणांनी व्यापक मोहीम हाती घेतली होती.या शोधमोहिमेत दुर्गम डोंगराळ



भाग आणि जंगलांमध्ये विशेष पथके तैनात करण्यात आली होती. जवानांचा शोध घेण्यासाठी ड्रोन तसेच प्रशिक्षित श्वानपथकांचीही मदत घेण्यात आली. अखेर गुरुवारी शोधमोहिमेदरम्यान दच्छनच्या जंगलात दोन्ही जवानांचे मृतदेह आढळून आले. मिळालेल्या माहितीनुसार, ज्या ठिकाणाहून ते बेपत्ता झाले होते, त्या ठिकाणापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर त्यांचे मृतदेह सापडले. दोन्ही जवानांच्या शरीरावर गोळ्यांच्या अनेक जखमा आढळल्या आहेत.

बुधवारपासून होते बेपत्ता

मृत जवानांची नावे बाबी चंद आणि रशपाल कुमार अशी आहेत. बाबी चंद यांचे वय 57 वर्षे, तर रशपाल कुमार यांचे वय 45 वर्षे होते. दोघेही दच्छनमधील कियार गावात स्थानिक पोलिसांच्या स्पेशल ऑपरेशन्स ग्रुपमध्ये (SOG) तैनात होते. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी दोघेही आपल्या कॅम्पमधून धरना-मरवाह येथील लष्कराच्या चौकीकडे जात असताना बेपत्ता झाले होते. त्यावेळी त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र संपर्क होऊ शकला नाही. त्यानंतर त्यांचे मोबाईल फोन बंद असल्याचे आढळले.

दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा दलांची मोहीम

दोन्ही SPO जवानांच्या हत्येमागे दहशतवाद्यांचा हात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेत सहभागी असलेल्या दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा दलांनी परिसरात मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम सुरू केली आहे. जंगल आणि दुर्गम डोंगराळ भागात तपासाचा विस्तार करण्यात आला असून, सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या आहेत. या घटनेमुळे किश्तवाड परिसरातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

संरक्षण दलांनी आक्रमण आणि बचावासाठी सज्ज राहावे

शत्रूला अनपेक्षित धक्का देण्याची क्षमता विकसित करा

नवी दिल्ली : आधुनिक युद्धाचे बदलते स्वरूप आणि वेगाने विकसित होणारे तंत्रज्ञान लक्षात घेता भारतीय संरक्षण दलांनी आक्रमण आणि बचाव या दोन्ही आघाड्यांवर पूर्णपणे सज्ज राहावे, असे आवाहन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केले. शत्रूला अनपेक्षित धक्का देण्याची क्षमता विकसित करण्याबरोबरच ती कायम टिकवून ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नवी दिल्ली येथे आयोजित हवाई दलाच्या कमांडर्स परिषदेत ते बोलत होते. पारंपरिक तसेच नव्या प्रकारच्या धोक्यांचा सामना करण्यासाठी गुप्तचर आणि टेहळणी यंत्रणा अधिक सक्षम करणे, विविध यंत्रणांमध्ये समन्वय वाढविणे आणि संभाव्य धोक्यांचा आधीच अंदाज घेणे गरजेचे असल्याचे राजनाथ सिंह यांनी सांगितले.

संरक्षण दलांनी अशा क्षमता आणि कार्यपद्धती विकसित केल्या पाहिजेत की शत्रूला विचार करण्याची किंवा सावरण्याची संधी मिळणार नाही. त्याचवेळी शत्रूच्या अनपेक्षित हालचालींमुळे आपली यंत्रणाही बेसावध राहता कामा नये, असे राजनाथ सिंह म्हणाले. पारंपरिक युद्धपद्धतींसोबत इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करूनही शत्रूला अनपेक्षित धक्का देता येऊ शकतो. त्यासाठी गुप्तचर आणि टेहळणी यंत्रणा मजबूत करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. देशाचे जवान कोणत्याही नव्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी सतर्क, तत्पर आणि सज्ज असले पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय महामार्गावर वाहनाची धडक; दृष्टिहीन 50 वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

कन्नड : दि.१२ नोव्हेंबर - सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर वाहनाने पाठीमागून धडक दिल्याने सातकुंड येथील दृष्टिहीन व्यक्तीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. हरी

जाधव (वय ५०) असे मृत व्यक्तीचे नाव असून, गुरुवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास हा अपघात झाला. अपघातानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र पुढील उपचारासाठी जिल्हा



रुग्णालयात नेत असताना वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली.

मिळालेल्या माहितीनुसार, सातकुंड येथील रहिवासी हरी जाधव हे दृष्टिहीन होते. दि.१२ रोजी दुपारी सुमारे ३ वाजता ते सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरून पायी जात असताना एम.एच. १९ सी.झेड. २०८० क्रमांकाच्या वाहनाने त्यांना पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेत ते गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच त्यांना तातडीने कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी डॉ. रुकसार खान यांनी त्यांच्यावर तत्काळ प्राथमिक उपचार केले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. उपचारासाठी घेऊन जात असतानाच वाटेत त्यांची मृत्यूशी सुरू असलेली झुंज संपली. या घटनेची माहिती सातकुंड गावात समजताच गावावर शोककळा पसरली. हरी जाधव यांच्या अचानक निधनाने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले आणि एक मुलगी असा परिवार आहे. कुटुंबातील व्यक्तीच्या अकाली निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

शेतात आणि ग्रामपंचायती समोर तरुणाला मारहाण

कन्नड :दि.१२ नोव्हेंबर - वैजापूर येथील रोहित पठारे हत्याकांडाची घटना ताजी असतानाच कन्नड तालुक्यातील नावडी येथे एका २४ वर्षीय तरुणाला मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. सुरेश राजू जाधव (वय २४) असे जखमी तरुणाचे नाव असून, दि. ११ नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेमुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नावडी येथील सुरेश जाधव यांना प्रथम चिंचखोरी शिवारातील सुवर्णपालेश्वर डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या शेतात मारहाण करण्यात आली. त्यानंतर त्यांना गावात आणून ग्रामपंचायत कार्यालयासमोरही मारहाण करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत सुरेश जाधव जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी याप्रकरणी कारवाईची प्रक्रिया सुरू केली. कन्नड शहर पोलीस ठाण्यात दि. १२ नोव्हेंबर रोजी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

ऊसतोड कामगार महिलेचा कोयता लागून अपघाती मृत्यू

अंत्यसंस्कार रोखले; नातेवाईकांचा घातपात असल्याचा संशय

हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**सेलू तालुक्यातील कुपटा येथील आमदार संजय वाघमारे या ऊसतोड कामगार महिलेचा कोयता लागून अपघात होऊन झाला दुखापतीत उपचार दरम्यान मृत्यू झाला बाहेरच्या नातेवाईकांनी घातपाताचा संशय व्यक्त करत अंत्यसंस्कार रोखले होते पोलिसांनी हस्तक्षेप नंतर परिस्थिती शांत झालीआणि नंतर त्या महिलेचे अंत्यसंस्कार करण्यात आले.

अधिक माहिती अशी की संजय वाघमारे आणि त्यांची पत्नी नंदा वाघमारे कोल्हापूर जिल्ह्यातील ऊस तोडी साठी गेले होते 11 नंबरच्या दुपारी आनंद



यांच्या हाताला कोयता लागून गंभीर इजा झाली त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार करण्यासाठी दाखल करण्यात आले शासकीय रुग्णांना देण्यात आले या ठिकाणी त्यांचा मृत्यू झाला नंदा यांच्या माहेरच्या नातेवाईकांनी घातपातच संशय व्यक्त करून अंत्यसंस्कार केला त्यामुळे गुप्ता येथील त्यांच्या घरी तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती त्या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली आहे पोलीस अंमलदारी दीपक पाटील यांनी कागदपत्र तपासली साई पोलीस निरीक्षक श्री स्वामी यांनी नातेवाईका सोबत फोनवर संवाद साधून कायदेशीर प्रक्रिये बाबत माहिती दिली पोलीस पाटील सरपंच यांच्या सहकार्याने नंदा वाघमारे यांच्या मृतदेहावर अंतिम संस्कार करण्यात आले.

घटना घडल्यानंतर पोलिसाकडून पंचनामा तसेच सविच्छेदनाची प्रक्रिया करण्यात आली त्या प्रक्रिया बाबतचे सर्व कागदपत्रे कुटुंबाकडे असल्याने प्राथमिक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच हे दिसून येते अंत्यविधी रोखून महिलेचे अभिनंदन होऊ नये याकरिता संविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही कायदेशीर केली जाणार असल्याचे पोलिस अंमलदार दीपक पाटील यांनी माहिती दिली.

एलपीजी गॅस ची अवैध रित्या विक्री करून सात लाखाचा केला अपहार

फसवणूक केल्याप्रकरणी चौघा जनावर गुन्हा दाखल

हिंदू प्रकाश वार्ता /अशोक पवार

परभणी : येथील गॅस विक्रीच्या पेट्रोल पंप कंपनीचा विश्वासात करून आठ हजार 211 लिटर एलपीजी गॅसची विक्री अवैध विक्री करत सहा लाख 80 हजार रुपयाचा 778 रुपये किमतीचा अपहर करण्यात आला असून हा प्रकार गंगाखेड रोडवरील तो गॅस पंपावर घडला या प्रकरणी चार जनावर 10नोव्हेंबरला कोतवाली पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की रोहित गवळी यांनी ही तक्रार दिली आहे फिर्यादी हे कॉंक्रीटन्स पेट्रोल इंडिया लिमिटेड कंपनीत कार्यरत आहेत या कंपनीकडून परभणीत गंगाखेड रोडवर गो गॅस नावाने एलपीजी गॅस चा पंप आहे त्या ठिकाणी व्यवस्थापक व इतर कर्मचारी कार्यरत आहेत संबंधितांनी 27 सप्टेंबर ते 22 ऑक्टोबर या कालावधीत एलपीजी गॅस चा फार मोठा अपहर केला आहे कंपनीच्या सहमती विना अनधिकृत एलपीजी गॅस अवैधरित्या विक्री केली याबाबत विचारणा केली असता कर्मचारीचे कर्मचाऱ्यांनी उडवा उडवी उत्तरे देण्यात आली सीसीटीव्हीवरील पंपावर येणाऱ्या संशयित वाहने कैद झाले आहेत त्यांची चौकशी केली असता तेव्हा अनुवाद त्या वाहनाविषयी चौकशी केली असता माहित नाही असे उत्तर संबंधित व्यक्तीने दिले कंपनीच्या या विश्वासघात करत आर्थिक व्यवहाराचा घोळ करून अपहारकेल्या प्रकरणी हनुमान एकनाथराव सिसोदे प्रल्हाद पंडितराव चव्हाण नामदेव शंकरराव चव्हाण किरण बालाजी कच्छवे या चौघा जनावर कोतवाली पोलिसात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत..

गोवंशाचे अवैध वाहतूक करणाऱ्या कंटेनर पोलिसांच्या ताब्यात

बावीस लाख पंधरा हजाराचा मुद्देमाल जप्त ; 23 गो वंशाची सुटका, स्थानिक गुन्हा शाखेची कारवाई

हिंदू प्रकाश वार्ता/ अशोक पवार

परभणी**पालम तालुक्यामध्ये स्थानिक गुना शाखेच्या पथकाने दिनांक 11 नोव्हेंबर बुधवार रोजी मध्यरात्रीच्या सुमारास पालम ते मरडसगाव रोड व एका संशयास्पद कंटेनरला जप्त केले असून सदर वाहनातून अवैधरित्या गोवर्षाची वाहतूक केल्या जात असल्याचे माहिती मिळाली या कारवाईत 23 गोवंशाची सुटका करण्यात आली असून 22 लाख 15 हजार रुपयांचा मुद्देमाल यावेळी उपस्थित मुद्देमाल जप्त करण्यात आला असून स्थानिक गुना शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार पोलीस अंमलदार केशवराज लटपटे लक्ष्मण कांगणे पालम पोलिसांनी मिळून ही कारवाई करणे केली आहे त्या कंटेनरच्या तपासणी 23 गोवंशाचे अत्यंत निर्दयीपणाने दाटीवाटी मध्ये त्यांना कोंबून भरलेल्या अवस्थेत आढळले यातून दोन बैल मयत झाले असून त्यांना हे दोन बैल जखमे अवस्थेत आहेत सदर गोवंशाची वाहतूक कत्तलीसाठी केली जात आहे होती या प्रकरणात पालम पोलिसात कंटेनरचा चालक व इतर एका अनोळखी इसमावर



गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलिसांनी एम एच 40 एके 86 73 या क्रमांकाच्या आयशर कंटेनर वआणि 23 गोवंश जप्त केले आहे पालम पोलिसांनी ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक प्रकाश लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिक तपास करत आहे असून दोन गोवंश जखमी अवस्थेत आणणारे सदर हे गोवंश्य कत्तली करिता वाहतूक करत असताना असल्याचे आढळून आले याप्रकरणी फिर्यादीच्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे पालम येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस स्टेशन डायरी नंबर 519 26 कलम पाच ब 9 11 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 1976 कलम 3/11 प्राण्यासपणे वागवण्यास प्रतिबंध अधिनियम 1960 सह कलम 47 50 56 प्राण्याचे परिवहन अधिनियम 1978 सहकलम तीन ऑब्लिक पाच बी एन एस प्रमाणे गुन्ह्याचे नोंद करण्यात आला असून यामध्ये एक आयशर कंपनीचा कंटेनर पासिंग क्रमांक एम एच 40 एके 86 73 अंदाजे किंमत 15 लाख रुपये त्यामध्ये एकूण त्यापैकी 21 जिवंत दोन मयत किंमत अंदाजे सात लाख पंधरा हजार रुपये असा एकूण 22 लाख 15 हजार रुपयांचा मुद्देमालजप्त करण्यात आला असून पुढील कारवाईस्तव 21 गोवंशसुखरूप पणे गोशाळेकडे सुपूर्दकरण्यात आले त्यामध्ये आयशरचा कंटेनर चालक चालकासोबतच एक इसम यावर सदर गुन्हा नोंद करण्यात आला असून फरार आरोपीचा शोध सुरू असून सदरची कार्यवाही श्री पंकज कुमार कुमावत पोलीस अधीक्षक परभणी यांच्या मार्गदर्शनाखाली तानाजी चिखले अपर पोलीस अधीक्षक परभणी यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हा शाखेचेपोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या पथकाने पोलीस उपनिरीक्षक चंदन सिंह परिवार पोलीस पाटील पोलीस अंमलदार केशवराज लटपटे लक्ष्मण कांगणे व पालम पोलिसांनी पोलीस उपनिरीक्षक प्रकाश लोखंडे यांच्यासह पालम पोलीस यांनी मिळून ही कारवाई केली

संत ज्ञानेश्वर उद्यानात दीपोत्सवाचा झगमगाट

पैठण : दीपावलीच्या मंगलमय पर्वानिमित्त संत ज्ञानेश्वर उद्यानात पहाटेच भव्य दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले. गार्डन वॉरियर्स व गार्डन ऊर्जा ग्रुप यांच्या संयुक्त पुढाकारातून आयोजित या उपक्रमात तब्बल 2 हजार पणत्या प्रज्वलित करून संपूर्ण उद्यान दीपप्रकाशाने उजळून निघाले. पहाटेच्या प्रसन्न वातावरणात हजारो पणत्यांच्या प्रकाशाने उद्यानाचे रूप अधिकच खुलले. दररोज नियमित व्यायामासाठी उद्यानात येणाऱ्या नागरिकांसाठी हा दीपोत्सव आनंदाची पर्वणी ठरला. या प्रसंगी पैठण येथील प्रसिद्ध किराणा व्यापारी सतीश सेठ लखोटिया यांच्या वतीने उपस्थितांना दिवाळीचा फराळ वाटप करण्यात आला. त्यांच्या या सहकार्यामुळे दीपोत्सवाच्या आनंदात आणखी भर पडली.या कार्यक्रमासाठी गार्डन वॉरियर्स ग्रुपचे ज्ञानेश्वर जाधव, डॉ. संदीप अंतरकर, लक्ष्मण वाघमारे, डॉ. संतोष रोडे, अर्जुन कराड सर, नंदकिशोर शेळके, बद्रीनाथ घटे, शंकर सोनवणे,कैलास सर्जे, विठ्ठल सव्वासे, कणसे, डॉ. गणेश शिंदे, संजय शेळके, संतोष तांगडे, अजय लखोटिया, राजेंद्र पठाडे तसेच गार्डन ऊर्जा ग्रुपचे अरुण गायकवाड, बद्रीनाथ गिरी, इंजिनिअर राजू काळे, महादेव बटुळे, जगदीश धस, कल्याण धायकर, फोटोग्राफर रघुनाथ चन्ने, देवेश इनामदार यांच्यासह दोन्ही ग्रुपमधील अनेक सदस्य व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मोलाचे योगदान दिले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सं पा द की य

आरबीआयच्या नव्या डीएमटी नियमांचा क्रांतिकारी वसा

भारतासारख्या विकसनशील आणि विशाल देशात अजूनही एक मोठा वर्ग असा आहे, ज्यांच्याकडे स्वतःचे अधिकृत बँक खाते नाही किंवा औपचारिक बँकिंग कागदपत्रांची पूर्तता करणे त्यांना कठीण जाते. अशा तळागाळातील घटकांसाठी, विशेषतः इतर शहरांत पोटाची खळगी भरण्यासाठी गेलेले मजूर आणि स्थलांतरित कामगारांसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने (RBI) घेतलेला एक नवीन निर्णय अत्यंत दिलासादायक आणि क्रांतिकारी ठरला आहे. ११ नोव्हेंबर २०२६ पासून लागू झालेल्या देशांतर्गत मनी ट्रान्सफर (DMT) बाबतच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार, आता बँक खाते नसलेली व्यक्तीही थेट बँकेच्या शाखेत जाऊन दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यात पैसे पाठवू शकणार आहे. आरबीआयच्या या नव्या नियमांमुळे औपचारिक बँक खाते नसलेले नागरिकही कॅश पे-इन आणि एनईएफटी (NEFT) द्वारे ५० हजार रुपयांपर्यंतची रक्कम थेट आपल्या नातेवाईकांच्या किंवा गरजवंतांच्या खात्यात जमा करू शकतात. याशिवाय बिझनेस करस्पॉन्डंट्स (BCs) आणि एटीएमच्या माध्यमातूनही हे पैसे हस्तांतरण सुलभ करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, ज्यांच्याकडे आवश्यक ओळखपत्र किंवा पत्त्याची कागदपत्रे नाहीत, अशा घटकांना बँकिंग व्यवहारांशी जोडणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक व्यवहारात जास्तीत जास्त १०,००० रुपये रोख आणि दरमहा २५,००० रुपयांपर्यंतची मर्यादा लाभार्थ्यांसाठी निश्चित करण्यात आली असून, मोबाईल क्रमांक आणि स्वयं-साक्षांकित कागदपत्रांच्या आधारे ग्राहकांची नोंदणी सुलभ करण्यात आली आहे. डिजिटल भारताच्या युगात कोणतीही व्यक्ती केवळ बँक खाते किंवा कागदपत्रांच्या अभावामुळे आर्थिक व्यवहारांपासून वंचिता राहू नये, यासाठी आरबीआयचे हे पाऊल अतिशय दूरदर्शी आहे. या सुविधेमुळे स्थलांतरित मजुरांना आपल्या गावाकडे पैसे पाठवण्यासाठी आता अनधिकृत किंवा जाचक मार्गांचा अवलंब करावा लागणार नाही. बँकिंग क्षेत्राची व्याप्ती वाढवणारा आणि सर्वसामान्य नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभा राहणारा हा निर्णय देशाच्या आर्थिक समावेशकतेच्या दिशेने टाकलेले एक सुवर्णपाऊल आहे.

प्रेमाच्या शोधात निघालेली स्त्री आणि नियतीने दिलेली नेतृत्वाची जबाबदारी!

इटलीच्या छोट्याशा गावातून भारताच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी पोहोचलेला सोनिया गांधी यांचा प्रवास केवळ सत्तेचा इतिहास नाही, तो प्रेम, विरह, संघर्ष, कुटुंब आणि स्वत:च्या इच्छेपेक्षा कर्तव्याला प्राधान्य देणाऱ्या एका स्त्रीच्या आयुष्याचा भावस्पर्शी दस्तऐवज आहे.



काही माणसे आयुष्याचा प्रवास स्वतः ठरवतात, तर काहींच्या आयुष्याला नियती अशी वळणे देते की, त्यांना स्वतःच्या स्वप्नांपेक्षा परिस्थितीने दिलेली जबाबदारी मोठी मानावी लागते. सोनिया गांधी यांचा जीवनप्रवास याच दुसऱ्या प्रकारात मोडतो. इटलीतील एका सामान्य कुटुंबात जन्मलेली तरुणी प्रेमाच्या ओढीने भारतात आली, पण काळाच्या प्रवाहाने तिला भारतीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आणून उभे केले. "Belonging - A Journey of Love" या आत्मकथनाच्या शिर्षकातच या प्रवासाचा गाभा दडलेला आहे. आपलेपणाचा शोध, प्रेमाची ओढ आणि आयुष्यभर मनात जपलेली नाती! या विशेष लेखातून आत्मकथनातील अनेक पैलू समोर येतात. सोनिया गांधी यांचे बालपण इटलीतील ऑर्बासानो या छोट्याशा गावात गेले. निसर्गरम्य परिसर, कुटुंबाचे संस्कार, वडिलांचे शिस्तप्रिय व्यक्तिमत्त्व आणि साधे कौटुंबिक जीवन यांत त्यांचे बालपण घडले. त्या काळातील आठवणी त्यांच्या मनात आजही जिवंत आहेत. बालपणातील माणसे, भाषा, घर आणि संस्कृती यांच्याशी असलेली नाळ किती खोल असते, याची जाणीव त्यांच्या आठवणींतून होते.

जीवनाला अनपेक्षित दिशा देणारी भेट केंब्रिजमध्ये झाली. राजीव गांधी यांच्याशी झालेली ओळख पुढे प्रेमात बदलली आणि दोघांनी विवाहाचा निर्णय घेतला. हा केवळ दोन व्यक्तींचा विवाह नव्हता, तर दोन भिन्न संस्कृती, भाषा, परंपरा आणि जीवनशैली यांना जोडणारा भावनिक पूल होता. प्रेम माणसाला भौगोलिक सीमा ओलांडायला शिकवते; पण त्या नव्या जगात स्वतःला सामावून घेण्यासाठी संयम, समजूतदारपणा आणि स्वीकाराची तयारीही लागते. सोनिया गांधी यांनी भारतात येऊन हे आव्हान स्वीकारले. भारत त्यांच्यासाठी सुरुवातीला अपरिचित होता. नवी भाषा, नवे लोक, वेगळे खाद्यपदार्थ, सामाजिक संकेत आणि मोठे राजकीय कुटुंब या सगळ्यांशी जुळवून घेणे सोपे नव्हते. इंदिरा गांधी यांच्या कुटुंबात प्रवेश केल्यानंतर त्यांना केवळ सून म्हणून नव्हे, तर एका ऐतिहासिक राजकीय घराण्याचा भाग म्हणूनही जगावे लागले. मात्र, सार्वजनिक झगमगाटापेक्षा त्यांना कुटुंब, मुलांचे संगोपन आणि खासगी आयुष्य अधिक महत्त्वाचे वाटत होते. राजकारणापासून दूर राहण्याची त्यांची इच्छा वृत्तविशेषातून स्पष्ट होते.

परंतु इतिहास नेहमी व्यक्तीच्या इच्छेप्रमाणे चालत नाही. १९८४ मध्ये इंदिरा गांधी यांची हत्या झाली. या घटनेने संपूर्ण देश हादरला आणि गांधी कुटुंबाच्या आयुष्यात दुःखाचा डोंगर कोसळला. राजीव गांधी यांच्यावर पंतप्रधानपदाची जबाबदारी आली. कुटुंबासाठी हा काळ असुरक्षितता, भीती आणि मानसिक तणावाचा होता. एका बाजूला देशाचे नेतृत्व, तर दुसऱ्या बाजूला कुटुंबाचे संरक्षण या दोन्ही आघाड्यांवर राजीव गांधी यांना उभे राहावे लागले. १९९१ मध्ये राजीव गांधी यांचीही हत्या झाली. हा सोनिया गांधी यांच्या आयुष्यातील आणखी एक असह्य आघात होता. पतीचा मृत्यू म्हणजे केवळ वैयक्तिक नात्याचा अंत नसतो; तर अनेक स्वप्ने, आठवणी, भविष्याची कल्पना आणि कुटुंबाचा आधारही एका क्षणात कोसळतो. दोन मुलांच्या जबाबदारीसह या दुःखातून सावरणे ही मोठी मानसिक लढाई होती. अशा वेळी राजकारणात प्रवेश करण्यापेक्षा कुटुंबाला सावरणे आणि मुलांचे भविष्य सुरक्षित करणे हेच त्यांचे प्राधान्य होते.

पण काँग्रेस पक्षातील कार्यकर्ते आणि नेत्यांचा आग्रह वाढत गेला. पक्षातील नेतृत्वाची पोकळी, राजकीय परिस्थिती आणि गांधी कुटुंबाशी असलेले भावनिक नाते यामुळे त्यांच्यासमोर सार्वजनिक जीवनात येण्याचा प्रश्न उभा राहिला. त्यांनी सुरुवातीला या जबाबदारीपासून दूर राहण्याचा प्रयत्न केला. १९९८ मध्ये त्यांनी काँग्रेसचे नेतृत्व स्वीकारले. हा निर्णय सत्तेच्या मोहातून घेतला, असे सरधोपटपणे म्हणता येणार नाही. त्यामागे पक्षाचे अस्तित्व, कार्यकर्त्यांचा विश्वास आणि राजकीय परिस्थितीचा दबाव असे अनेक घटक होते. २००४ मध्ये काँग्रेसप्रणीत आघाडीला विजय मिळाल्यानंतर पंतप्रधानपदाचा प्रश्न निर्माण झाला. त्या वेळी सोनिया गांधी यांच्याकडे पंतप्रधान होण्याची राजकीय संधी होती. परंतु त्यांनी हे पद स्वीकारले नाही आणि डॉ. मनमोहन सिंग यांचे नाव पुढे केले. हा निर्णय भारतीय राजकारणातील महत्त्वाच्या घटनांपैकी एक ठरला. सत्तेची संधी असूनही पद न स्वीकारणे हा निर्णय त्यांच्या समर्थकांसाठी त्यागाचे प्रतीक ठरला, तर विरोधकांनी त्यावर राजकीय टीकाही केली. लोकशाहीत कोणत्याही निर्णयाचे मूल्यमापन भावनेपेक्षा तथ्य, परिणाम आणि घटनात्मक प्रक्रियेच्या आधारे झाले पाहिजे. तरीही पदापेक्षा स्वतःची भूमिका महत्त्वाची मानण्याचा हा प्रसंग राजकीय चर्चेत कायम राहिला.

या प्रवासात कुटुंबाची भूमिका महत्त्वाची होती. मुलांचे संगोपन, वैयक्तिक दुःख, सार्वजनिक जीवनातील टीका आणि सततची राजकीय जबाबदारी यांचा समतोल राखणे सोपे नव्हते. सार्वजनिक व्यक्तींच्या जीवनात प्रत्येक कृतीवर प्रश्न उपस्थित होतात; त्यांच्या खासगी भावनांनाही सार्वजनिक चर्चेचा विषय बनवले जाते. मात्र, राजकारणी असणे म्हणजे माणूस असणे संपत नाही. त्यांच्या आयुष्यातील वेदना, भीती, आठवणी आणि कुटुंबाविषयीची ओढ यांनाही मानवी दृष्टिकोनातून समजून घेणे आवश्यक आहे. या आत्मकथनाच्या शिर्षकातील Belonging हा शब्द विशेष अर्थपूर्ण आहे. माणूस कुठे जन्मला यापेक्षा त्याला कुठे आपलेपणा मिळतो, कोणत्या नात्यांमध्ये तो स्वतःला शोधतो आणि कोणत्या मूल्यांशी त्याची बांधिलकी तयार होते, हे अधिक महत्त्वाचे असते. सोनिया गांधी यांच्यासाठी इटली जन्मभूमी राहिली, भारत कर्मभूमी आणि कुटुंबाच्या आठवणींनी जोडलेली भूमी बनला. प्रेमाने त्यांना भारतात आणले, पण काळाने त्यांना सार्वजनिक जीवनातील संघर्षाची ओळख करून दिली.

या कथेतून भारतीय समाजाने स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोनही तपासला पाहिजे. एखादी स्त्री विवाहानंतर देश बदलते, कुटुंबासाठी स्वतःची स्वप्ने मागे ठेवते, दुःखातून उभी राहते आणि सार्वजनिक जीवनात भूमिका बजावते, तेव्हा तिच्या प्रत्येक निर्णयाचे मूल्यमापन करण्याचा अधिकार समाजाला आहे, पण तिच्या वैयक्तिक अस्तित्वाचा अपमान करण्याचा अधिकार कोणालाही नाही. स्त्रीची ओळख केवळ पत्नी, सून, आई किंवा राजकीय घराण्याची सदस्य एवढीच नसते. ती स्वतंत्र विचारांची, निर्णयक्षम आणि स्वतःच्या भावविश्वाची व्यक्ती असते. सोनिया गांधी यांचा प्रवास निर्विवादपणे यशाचा किंवा त्यागाचा एकरेषीय गौरवगीत नाही. त्यांच्या राजकीय भूमिकांवर मतभेद असू शकतात, निर्णयांवर टीका होऊ शकते आणि त्यांच्या कार्याचे मूल्यमापन इतिहास करेल. पण प्रेमातून सुरू झालेल्या जीवनप्रवासाला दुःख, जबाबदारी आणि सार्वजनिक नेतृत्वाची वळणे मिळाली, हे वास्तव नाकारता येत नाही.

शेवटी, Belonging: A Journey of Love ही केवळ एका राजकीय व्यक्तिमत्त्वाची कहाणी म्हणून वाचू नये. ती माणसाच्या नात्यांची, आठवणींची आणि काळाच्या कसोटीवर टिकून राहण्याच्या सामर्थ्याची कहाणी आहे. प्रेम माणसाला एका घरातून दुसऱ्या घरात घेऊन जाते; पण जबाबदारी त्याला समाजाशी जोडते. आयुष्याच्या वाटेवर काही स्वप्ने अपूर्ण राहतात, काही नाती काळाच्या आघातात हरवतात; तरीही माणूस पुन्हा उभा राहतो, कारण त्याच्या जगण्याला अर्थ देणारे आपलेपण त्याला पुढे चालण्याचे बळ देते. हाच या प्रवासाचा सर्वांत हृदयस्पर्शी संदेश आहे.

प्रवीण बागडे
साहित्यिक आणि सामाजिक विश्लेषक,
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

महाराष्ट्रात हाड गोठवणारी थंडी घेऊन येतेय नवीन लाट

13 नोव्हेंबरपासून हुडहुडी भरणार!

महाराष्ट्रातील हवामानात सध्या सातत्याने मोठे बदल होत असून उत्तरेकडील थंड वाऱ्यांचा प्रभाव आता थेट राज्यातील वातावरणावर जाणवू लागला आहे. दिवाळीचा सण संपल्यानंतर आता तापमानाचा पारा झपाट्याने घसरत चालला असून येत्या काही दिवसांत राज्यातील तापमानात दोन ते तीन अंशांची मोठी घट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार 13 नोव्हेंबर रोजी राज्यभरात हवामान मुख्यत्वे कोरडे आणि निरभ्र राहणार आहे. या बदलत्या वातावरणामुळे नागरिकांना दिवसा कडक उन्हाचे चटके सहन करावे लागणार आहेत, तर पहाटे आणि रात्रीच्या वेळी हुडहुडी भरवणारा गारवा किंवा गुलाबी थंडी जाणवणार आहे. कोकणापासून विदर्भापर्यंत सर्वच विभागांमध्ये या थंडीच्या लाटेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येणार आहे.

उत्तर आणि दक्षिण कोकणात शुक्रवारी हवामान पूर्णपणे कोरडे आणि आकाश पूर्णपणे निरभ्र राहणार असून दिवसा उन्हाचा चांगलाच चटका जाणवेल. या भागातील कमाल तापमान 33 ते 35 अंश सेल्सिअसच्या दरम्यान तर किमान तापमान 18 ते 24 अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे आणि यादरम्यान पावसाची कोणतीही शक्यता वर्तवण्यात आलेली नाही. दुसरीकडे, दक्षिण मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यांत किमान तापमानात सातत्याने घट होत चालली आहे. दिवसभर हवामान पूर्णपणे कोरडे राहून लख्ख ऊन पडेल आणि येत्या दोन दिवसांत किमान तापमानात एक ते दोन अंशांची घट होऊन पहाटेच्या वेळी गारठा वाढणार आहे.

उत्तर मध्य महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि अहिल्यानगर या भागात देखील आकाश निरभ्र राहणार असून या पट्ट्यात थंडीचा प्रभाव सर्वाधिक जाणवत आहे. रात्रीच्या वेळी तापमानात दोन ते तीन अंशांची घट होण्याची दाट शक्यता आहे. मराठवाड्यात देखील हवामान पूर्णपणे निरभ्र आणि कोरडे राहणार असून छत्रपती संभाजीनगरसह जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड आणि परभणी या जिल्ह्यांमध्ये पावसाची कोणतीही शक्यता नाही. कोरड्या हवामानामुळे आणि स्वच्छ सूर्यप्रकाशामुळे सध्या शेतीकामांसाठी अत्यंत पूरक वातावरण तयार झाले आहे.

विदर्भातील नागपूर आणि अमरावतीसह सर्वच जिल्ह्यांमध्ये हवामान कोरडे राहण्याचा अंदाज आहे. येथील कमाल तापमान 34 अंशांच्या आसपास राहील तर किमान तापमान 18 अंश सेल्सिअसपर्यंत खाली घसरण्याची शक्यता आहे. एकंदरीत विचार केल्यास, पाऊस पूर्णपणे थांबल्यामुळे आणि आकाश निरभ्र राहिल्यामुळे सूर्यप्रकाश थेट जमिनीवर पडत आहे, ज्यामुळे दुपारी उन्हाचा चटका वाढला आहे. मात्र, रात्रीच्या वेळी जमिनीवरील उष्णता वेगाने निघून जात असल्याने पहाटेच्या सुमारास तीव्र गारवा किंवा गुलाबी थंडी अनुभवायला मिळत आहे. पुढील काही दिवसांत हा गारठा आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह - २०२६ निमित्त लेख...

महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी क्रांतिवीरांचे योगदान

आदिवासी' हा शब्द उच्चारताच आपल्या डोळ्यांसमोर एक आगळीवेगळी संस्कृती उभी राहते. आदिवासी जमातींमध्ये वैशिष्ट्यपूर्ण प्रथा, परंपरा, संस्कृती आणि जीवनशैली आढळून येते. आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा आणि गुणवैशिष्ट्ये आजही आदिवासी बांधवांकडून जपली जात आहेत. सामूहिक जीवनपद्धती, एकत्रित निर्णयप्रक्रिया, गरजेपुरते उत्पादन घेणे आणि जंगलाचे संरक्षण करणे अशा अनेक अनुकरणीय प्रथा व परंपरा आदिवासी समाजाने जपल्या आहेत. भारताच्या आणि महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्यात अनेक महनीय व्यक्तींनी योगदान दिले. यामध्ये आदिवासी समाजाचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण राहिले आहे.

ब्रिटिश राजवटीविरुद्ध आदिवासी समाजाने केवळ देशाच्या स्वातंत्र्यासाठीच नव्हे, तर जल, जंगल, जमीन, सामाजिक न्याय आणि स्वाभिमानाच्या रक्षणासाठीही संघर्ष केला. आदिवासी समाजातील अनेक क्रांतिकारकांनी ब्रिटिश सत्तेला आव्हान दिले. काहींनी दीर्घकाळ संघर्ष करून ब्रिटिशांच्या अन्यायकारक धोरणांना तीव्र विरोध केला. या संघर्षात अग्रणी असलेल्या धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांनी 'उलगुलान'चा नारा देत आदिवासी समाजाला संघटित केले. छोटानागपूर परिसरातील आदिवासींच्या हक्कांसाठी त्यांनी व्यापक आंदोलन उभारले. सन १८९४ मध्ये वनशुल्क माफीसाठी आंदोलन करून त्यांनी आदिवासींच्या न्याय्य हक्कांचा आवाज बुलंद केला. दुष्काळाच्या काळात जनतेसाठी केलेल्या कार्यामुळेही त्यांच्याविषयी आदिवासी समाजात आदराची भावना निर्माण झाली. त्यांचे कार्य आदिवासी समाजासाठी प्रेरणादायी ठरले. महाराष्ट्रातील अनेक आदिवासी क्रांतिकारकांनीही ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष केला. त्यांपैकी काही प्रमुख क्रांतिवीरांचे योगदान पुढीलप्रमाणे आहे

आद्य क्रांतिवीर राघोजी भांगरे


अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील देवगाव येथे १८०५ साली महादेव कोळी जमातीत जन्मलेल्या स्वाभिमानी राघोजी भांगरे यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंड पुकारले. सन १८३८ मध्ये रतनगड आणि परिसरातील किल्ल्यांच्या भागात त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध मोठा उठाव केला. आपण शेतकरी व गोरगरिबांचे कैवारी असून जुलमी सावकार आणि ब्रिटिश सत्तेचे विरोधक आहोत, अशी त्यांची ठाम भूमिका होती.

नोव्हेंबर १८४४ ते मार्च १८४५ या काळात राघोजी भांगरे यांच्या नेतृत्वाखालील संघर्ष अधिक तीव्र झाला. त्यांनी ब्रिटिश सत्तेला आव्हान देत आदिवासी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी लढा दिला. अखेर ब्रिटिशांनी त्यांना अटक करून ठाणे येथे नेले. २ मे १८४८ रोजी ठाणे येथील कारागृहात त्यांना फाशी देण्यात आली. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी आणि स्वाभिमानासाठी संघर्ष करणारे राघोजी भांगरे यांचे योगदान महाराष्ट्राच्या इतिहासात महत्त्वपूर्ण आहे.

क्रांतिवीर खाज्या नाईक

भिल्ल समाजातील क्रांतिवीर खाज्या नाईक यांनी खान्देश परिसरातील ब्रिटिशविरोधी आदिवासी उठावाचे नेतृत्व केले. ब्रिटिशांच्या अन्यायकारक धोरणांना विरोध करून त्यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी संघर्ष केला. आदिवासी प्रदेशातून होणाऱ्या व्यापारावरील कराचा लाभ स्थानिक आदिवासींना मिळाला पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती.

सन १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात खाज्या नाईक यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष तीव्र केला. सेंधवा घाट परिसरात ब्रिटिशांचा खजिना लुटल्याच्या घटनेनंतर ब्रिटिशांनी



त्यांच्याविरुद्ध मोहीम उघडली. आंबापाणीच्या जंगलात खाज्या नाईक आणि त्यांच्या साथीदारांनी आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेल्या ब्रिटिश सैन्याशी शर्थीची झुंज दिली. सन १८५८ मध्ये झालेली आंबापाणीची लढाई खान्देशातील आदिवासींच्या ब्रिटिशविरोधी संघर्षाच्या इतिहासात महत्त्वपूर्ण मानली जाते. ब्रिटिश सत्तेला आव्हान देणाऱ्या खाज्या नाईक यांचा संघर्ष मोडून काढण्यासाठी इंग्रजांनी विविध प्रयत्न केले. अखेर सन १८६० मध्ये कपटाने त्यांची हत्या करण्यात आली. आदिवासी समाजात दहशत निर्माण करण्यासाठी त्यांचे शिर कापून जळगाव जिल्ह्यातील धरणगाव येथे झाडाला आठवडाभर टांगून ठेवल्याचा उल्लेख ऐतिहासिक संदर्भांमध्ये आढळतो. ब्रिटिशांच्या अन्यायाविरुद्ध संघर्ष करणारे खाज्या नाईक हे आदिवासी समाजाच्या शौर्याचे प्रतीक ठरले.

वीर बाबुराव शेडमाके

१२ मार्च १८३३ रोजी जन्मलेले वीर बाबुराव शेडमाके हे चंद्रपूर परिसरातील गोंड समाजाचे महान आदिवासी क्रांतिकारक होते. त्यांनी ब्रिटिश अंमलाखालील चंद्रपूर परिसरात इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. सन १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात सुमारे ५०० आदिवासी युवकांना एकत्र करून त्यांनी सैन्य उभारले आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध हल्ले चढवून इंग्रजांना जेरीस आणले.

२९ एप्रिल १८५८ रोजी बाबुराव शेडमाके यांनी आपल्या सैन्यासह अहेरी परिसरातील चिचगुडी येथील ब्रिटिशांच्या तारयंत्र छावणीवर हल्ला केला. या हल्ल्यात ब्रिटिशांचे दोन तारयंत्र कर्मचारी मारले गेले. बाबुराव शेडमाके यांना पकडण्यात अपयश येत असल्यामुळे इंग्रजांनी कूटनीतीचा अवलंब केला. अखेर १८ सप्टेंबर १८५८ रोजी त्यांना अटक करून चांदा येथे आणण्यात आले.

२१ ऑक्टोबर १८५८ रोजी ब्रिटिशांनी त्यांना फाशी दिली. अशा प्रकारे वीर बाबुराव शेडमाके यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष करत आपल्या प्राणांचे बलिदान दिले. त्यांच्या शौर्यपूर्ण कार्याच्या स्मरणार्थ भारत सरकारने १२ मार्च २००९ रोजी विशेष टपाल तिकीट प्रसिद्ध करून त्यांचा गौरव केला.

क्रांतिवीर शामा दादा कोलाम

यवतमाळ जिल्ह्यातील बाभूळगाव परिसरात २६ नोव्हेंबर १८९९ रोजी कोलाम जमातीत जन्मलेले शामा दादा कोलाम हे आदिवासी समाजातील एक संघर्षशील व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. गरिबांचे कैवारी आणि धनदांडग्यांचा कर्दनकाळ अशी त्यांची ओळख होती. त्यांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या काळात निजामशाहीविरुद्ध सशस्त्र संघर्ष केला.

इंग्रज, निजामशाही आणि जुलमी सावकारांच्या शोषणाविरुद्ध त्यांनी संघर्षाची भूमिका घेतली. गोरगरिबांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी शोषण व्यवस्थेला आव्हान दिले. धनदांडग्यांकडून संपत्ती हस्तगत करून गरिबांना मदत करत असल्यामुळे त्यांना 'विदर्भाचे रॉबिनहुड' म्हणून संबोधले जात असे.

शोषित आणि वंचित समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या शामा दादा कोलाम यांच्या कार्याला आदिवासी समाजाच्या इतिहासात विशेष महत्त्व आहे. सामाजिक अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा त्यांच्या संघर्षातून मिळते.

क्रांतिवीर नाग्या महादू कातकरी

रायगड जिल्ह्यातील चिरनेर गावातील आक्कादेवी कातकरीवाडी येथील नाग्या महादू कातकरी हे आदिवासी समाजातील एक शूर क्रांतिकारक होते. सन १९३० मध्ये महात्मा गांधींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केल्यानंतर देशभरात सविनय कायदेभंग चळवळीला गती मिळाली. याच काळात रायगड जिल्ह्यात ब्रिटिशांच्या अन्यायकारक वनकायद्यांविरुद्ध जंगल सत्याग्रह उभारण्यात आला. आदिवासी समाजाच्या उपजीविकेवर निर्बंध आणणाऱ्या ब्रिटिशांच्या वनकायद्यांना नाग्या कातकरी यांनी विरोध केला. जंगलातील गवत कापण्यावर घालण्यात आलेली बंदी झुगारून त्यांनी आपल्या साथीदारांसह जंगल सत्याग्रहात सहभाग घेतला. ब्रिटिशांच्या अन्यायकारक कायद्यांविरुद्धचा हा संघर्ष आदिवासी समाजाच्या पारंपरिक हक्कांच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरला.

२५ सप्टेंबर १९३० रोजी चिरनेर येथील जंगल सत्याग्रह मोडून काढण्यासाठी ब्रिटिश पोलिसांनी आंदोलकांवर निर्दयी गोळीबार केला. या गोळीबारात नाग्या महादू कातकरी यांच्यासह एकूण आठ सत्याग्रहींना हौतात्म्य प्राप्त झाले. अत्यंत तरुण वयात त्यांनी समाजाच्या हक्कांसाठी आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. त्यांचे कार्य आदिवासी समाजाच्या शौर्यशाली इतिहासातील प्रेरणादायी अध्याय आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ काही मोजक्या क्रांतिकारकांचा इतिहास नाही. या इतिहासात आदिवासी समाजातील असंख्य ज्ञात-अज्ञात वीर-वीरांगनांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. आदिवासी समाजातील क्रांतिकारकांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध विविध मार्गांनी संघर्ष केला. ब्रिटिशांच्या अन्यायकारक कायद्यांना विरोध केला, जंगल आणि जमिनीवरील पारंपरिक अधिकारांच्या संरक्षणासाठी लढा उभारला, तसेच सावकार आणि जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध संघर्ष केला. आदिवासी क्रांतिकारकांच्या बलिदानामुळे पुढील पिढ्यांमध्ये स्वातंत्र्य, समानता आणि स्वाभिमानाची भावना अधिक दृढ झाली.

आदिवासी समाजाच्या स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक योगदानाला योग्य स्थान मिळणे आवश्यक आहे. या योगदानाचा इतिहास पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे आणि क्रांतिवीरांच्या कार्याचे स्मरण करणे ही केवळ इतिहासाची गरज नसून आपली सामाजिक जबाबदारीही आहे. आदिवासी समाजाने स्वातंत्र्यलढ्यात दिलेले योगदान, केलेला त्याग आणि अन्यायाविरुद्ध उभारलेला संघर्ष हा भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील अभिमानास्पद वारसा आहे.

भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करणे म्हणजे केवळ त्यांच्या स्मृतींना उजाळा देणे नव्हे, तर त्यांनी दाखविलेल्या सामाजिक न्याय, स्वाभिमान, एकता आणि हक्कांच्या संरक्षणाच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करणे होय. त्यांच्या विचारांचा आणि आदिवासी क्रांतिवीरांच्या संघर्षाचा वारसा जतन करणे, त्यातून प्रेरणा घेणे आणि सामाजिक समतेच्या दिशेने वाटचाल करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

हितेश एच. वाळले
(संशोधन अधिकारी)
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, किनवट
मुख्यालय : छत्रपती संभाजीनगर

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

आदिवासी बांधवांसाठी योजनांचा लाभ; आठ दिवस शासकीय उपक्रमांचा जागर

शिक्षण, रोजगार, आरोग्य अन् आर्थिक सक्षमीकरणावर भर; 11 ते 18 नोव्हेंबरदरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

आदिवासी समाजाला शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासोबतच शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि आर्थिक स्वावलंबनाच्या माध्यमातून विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भगवान बिरसा मुंडा गौरव दिवस सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. ११ ते १८ नोव्हेंबरदरम्यान जिल्ह्यात विविध उपक्रम राबवून आदिवासी बांधवांपर्यंत शासकीय सेवा पोहोचविण्यात येणार आहेत. लाभार्थ्यांना आर्थिक मदत, महिलांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन, आरोग्य तपासणी, कागदपत्रांसाठी विशेष शिबिरे आणि आदिवासी संस्कृतीचे जतन अशा विविध उपक्रमांवर या सप्ताहात भर दिला जाणार आहे, अशी माहिती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी चेतना मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या जल, जंगल आणि जमिनीवरील हक्कांसाठी दिलेला लढा आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या संघर्षाची आठवण आणि आदिवासी स्वातंत्र्यवीरांचे योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचावे, यासाठी केंद्र शासनाने १५ नोव्हेंबर हा दिवस 'जनजातीय गौरव दिन' म्हणून घोषित केला आहे. आदिवासी समाजाची संस्कृती, भाषा, परंपरा, इतिहास आणि अस्मिता यांचे संवर्धन करण्याबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे हा सेवा सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे.

सप्ताहाची सुरुवात ११ नोव्हेंबरपासून झाली असून, १२ नोव्हेंबरपासून विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. १३ नोव्हेंबरला पात्र लाभार्थ्यांना



न्यूक्लियस बजेटअंतर्गत धनादेशांचे वितरण केले जाणार आहे. तसेच धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान, प्रधानमंत्री जनमन योजना आणि अन्य शासकीय योजनांचा लाभ दिला जाणार आहे. महिला बचत गटांना प्रोत्साहन, स्वयंरोजगार, कृषिपूरक व्यवसाय, सिंचन आणि शेतीतील उत्पादनवाढीसाठीही मार्गदर्शन करण्यात येईल.

१४ नोव्हेंबरला आदिवासी स्वातंत्र्यसैनिकांची स्मारके आणि महापुरुषांच्या पुतळ्यांची स्वच्छता व सुशोभीकरण केले जाणार आहे. वेरूळ येथे दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, आदिवासी देव-देवता, पूजापद्धती आणि सांस्कृतिक परंपरांचे दर्शन घडविण्यात येणार आहे. १५ नोव्हेंबरला भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त देशस्तरीय मुख्य शासकीय कार्यक्रम गडचिरोली येथे होणार आहे.

जिल्हास्तरावरही विविध ठिकाणी कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. १३ नोव्हेंबरला अंबड तहसील कार्यालयात लाभार्थ्यांना धनादेश वितरणासह अनुसूचित जमातीच्या विविध योजनांची माहिती दिली जाईल. १४ नोव्हेंबरला छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातील आदिवासी स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मारकांचे सुशोभीकरण केले जाणार आहे. जाफराबाद, शिवूर बंगला, चोकाळा आणि कन्नड येथील स्मारकांचीही स्वच्छता करण्यात येईल.

१५ नोव्हेंबरला छत्रपती संभाजीनगरमध्ये झाल्टा फाट्याजवळील अंबिका लॉन्स, आडगाव फाटा येथे क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा जयंतीचा मुख्य शासकीय कार्यक्रम होणार आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार असून, स्थानिक मंत्री, खासदार आणि आमदारही उपस्थित राहणार आहेत.

१६ नोव्हेंबरला शिरूर कासार येथे आधारकार्ड आणि अन्य आवश्यक शासकीय कागदपत्रांसाठी विशेष सेवा शिबिर आयोजित करण्यात आले आहे. १७ नोव्हेंबरला सिल्लोड येथे लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत भव्य मेळावा, आरोग्य तपासणी आणि पोषण जनजागृती शिबिर होणार आहे. या कार्यक्रमाला मंत्री, खासदार, आमदार यांच्यासह जालना जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार उपस्थित राहणार आहेत. १८ नोव्हेंबरला एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे सेवा सप्ताहाचा अधिकृत समारोप होईल. या पत्रकार परिषदेला निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, सहायक प्रकल्प अधिकारी डॉ. उद्धव वायाळ, निरीक्षक भागवत कदम, पी.एल. कायंदे, व्ही.एच. महिंद्रकर, महेशकुमार अंबुलगे आदी उपस्थित होते.

विघ्नहर्ता बिल्डकॉन प्रभाकर काळे व रविंद्र काळे यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा संपन्न



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१२ नोव्हेंबर

सोयगाव शहरामध्ये नव्याने व्यवसायाच्या समारंभ सोहळ्यास सोहणी कॉम्प्लेक्स येथे विघ्नहर्ता बिल्डकॉन उद्घाटन सोहळा निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून भैरवनाथ पतसंस्थेचे चेअरमन तथा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक प्रभाकर आबा काळे व सामाजिक कार्यकर्ते रवींद्र काळे,आत्माराम वाघ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.उद्घाटन प्रसंगी विघ्नहर्ता बिल्डकॉन मालक अविनाश पाटील व अमोल पाटील यांनी आलेल्या प्रमुख पाहुण्यांचा शाल व फुलगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी त्यांच्यासोबत आलेले पाहुणे नगरसेवक संतोष बोडखे,महेश जोशी,समाजसेवक अरुण सोहणी,समाजसेवक कृष्णा पाटील जूनघुरे,मुकुंद तळेले,पत्रकार अंकुश पगारे,पत्रकार शेख सुलेमान,तसेच सोयगाव शहरातील व्यापारी वर्ग,प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उद्घाटन सोहळा ठिकाणी उपस्थित होते.

गलवाड्यात दिवाळी पाडव्याला रेड्यांचा सगर उत्सव उत्साहात; रेड्यांची अर्धा तास झुंज

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



सोयगाव,दि.१२ नोंव्हेंबर

सोयगाव तालुक्यातील गलवाडा (अ) येथे दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने सालाबादप्रमाणे रेड्यांचा पारंपरिक सगर उत्सव मंगळवारी (दि.१०) उत्साहात साजरा करण्यात आला. या अनोख्या लोकपरंपरेने ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.पोळ्याच्या सणाप्रमाणे रेड्यांना सजवून, रंगरंगोटी करून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. गावाच्या वेशीबाहेर रेड्यांची विधिवत पूजा करून औक्षण करण्यात आले. यावेळी रेड्यांच्या मालकांचाही सन्मान करण्यात आला. त्यानंतर रेड्यांची झुंज लावण्यात आली. सुमारे अर्धा तास चाललेल्या या झुंजीचा आनंद ग्रामस्थांनी घेतला. उत्सवातील विविध क्षण नागरिकांनी मोबाईलमध्ये टिपले.

यावेळी मल्लू आप्पा औरंगे, जानकीराम औरंगे,मोहन औरंगे, गंगाराम दाभाडे,एकनाथ लवटे,मधुकर लवटे, समाधान लवटे, बुढाआप्पा औरंगे,सुनील सैदाणे, किरण इंगळे, पंजाबराव कुनगर, आनंदा इंगळे, अक्षय औरंगे, अनिल औरंगे, अंबादास घुले, पांडुरंग औरंगे, विजय औरंगे, शरद औरंगे, प्रदीप कुनगर,राजू औरगे, जितेंद्र सोनवणे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नागरी आरोग्यवर्धिनी केंद्राच्या कामकाजाचा आयुक्त डॉ. सुनील भोकरे यांनी घेतला आढावा



हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी**आयुक्त, शहरी आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान डॉ. सुनील भोकरे यांनी आज पाथरी तालुक्यातील बाबा कॉलनी येथील नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रास भेट देऊन केंद्राच्या कामकाजाचा तसेच नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांचा आढावा घेतला.

या भेटीदरम्यान त्यांनी आरोग्यवर्धिनी केंद्रातील विविध आरोग्य सेवा, आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी, उपलब्ध मनुष्यबळ, प्रयोगशाळा तपासणी सुविधा, औषधसाठा, अहवाल व अभिलेख नोंदणी यांची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून अद्ययावत माहिती घेतली.

महिलांची नियमित आरोग्य तपासणी, माता व बाल आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यावर त्यांनी विशेष भर दिला. तसेच आरोग्य संस्थांमध्ये येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला रुग्णकेंद्रित दृष्टिकोनातून दर्जेदार व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना केल्या.

शहरी भागातील आरोग्य संस्थांचे बळकटीकरण, आरोग्य सुविधांचा दर्जा उंचावणे आणि राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या अनुषंगाने ही क्षेत्रीय भेट घेण्यात आली.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. किशोर सुरवसे, सहाय्यक संचालक कुष्ठरोग तथा शहरी आरोग्य अधिकारी डॉ. श्रीनिवास कदम, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शेख काजी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निखिल पुजारी, वैद्यकीय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण पथक डॉ. संतोष गुंजकर, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अमित बिडवे, तालुका विस्तार अधिकारी तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पांचालेश्वर येथे भक्तिभावात दीपोत्सव साजरा; पाचोड बाल मंडळासह भाविक कुटुंबांना आरतीचा मान

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : श्री १००८ नंदिश्वर दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, पांचालेश्वर येथे दीपावलीनिमित्त दीपोत्सव भक्तिभावात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. मंदिर परिसरात दीपप्रज्वलन आणि विविध धार्मिक आरत्यांनी मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी विविध आरत्यांचा मान भाविक कुटुंबांसह पाचोड बाल मंडळाला देण्यात आला.

दीपोत्सवात प्रथम श्री नंदिश्वर दीपाची आरती करण्याचा मान छत्रपती संभाजीनगर येथील रमेशकुमारजी, रितेशकुमारजी आणि सौरभकुमारजी बडजातें परिवाराला मिळाला. द्वितीय श्री १००८ पद्मप्रभू भगवान यांची आरती पाचोड बाल मंडळाने केली. तृतीय श्री १००८ मुनिसुव्रत भगवान यांची आरती जयकुमारजी, सुयोगजी, अक्षयजी आणि दिव्यम बाकलीवाल परिवार (पाचोड) यांनी केली. चतुर्थ श्री १००८ पार्श्वनाथ भगवान यांची आरती अजितचंदजी, राजेंद्रकुमारजी, संजयजी, सम्यक आणि तनिष सेठी परिवाराने केली. तर पंचम श्री क्षेत्रपाल बाबांची आरती करण्याचा मान राजूजी आणि हर्षल काळा परिवार (पाचोड-गेवराई) यांना मिळाला. या धार्मिक सोहळ्यातून जैन धर्मपरंपरेचे जतन करण्यासह नव्या पिढीमध्ये धार्मिक संस्कार आणि जिनशासनाविषयी आवड निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. दीपोत्सव हा केवळ दिव्यांचा उत्सव नसून आत्मज्ञान, सदाचार आणि धर्मप्रभावनेचा संकल्प असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. सर्व आरती मानकरी परिवारांचे आणि पाचोड बाल मंडळाचे उपस्थित भाविकांनी अभिनंदन व अनुमोदना केले. दीपावली सोहळ्याच्या आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष गौतमचंद काला, कोषाध्यक्ष संजय सेठी, उपाध्यक्ष वृषभ गंगवाल, ॲड. सुहास चुडीवाल, सचिव भाऊसाहेब बाकलीवाल, विश्वस्त कैलाश खोबरे, विजय पापडीवाल, हिरालाल धोंडलकर, अशोक कासलीवाल, विलास पहाडे, राजेंद्र काला, भगवानदास काला, संतोष अजमेरा, प्रकाश सेठी, संदीप कासलीवाल, सुरज अन्नदाते, सुभाष बडजातें, अक्षय बडजातें, केतन बडजातें, आशिष पांडे, राजू काळा, दीपक खोबरे आणि दयाचंदजी पंडितजी यांच्यासह कार्यकारी मंडळाने सहकार्य केले.

यावेळी पदमभाऊ अजमेरा, संतोष अजमेरा, गौरव कासलीवाल, संजय रणदिवे, महावीर गंगवाल, सुभाष रणदिवे, पंकज काला, अभिजीत काला, सुनील पाटणी, वर्धमान काला, विपुल काला, ब्रम्हेश काला, अंशुल काला, मदन काला, सौ. शोभा सेठी, विनोद अजमेरा आदी भाविक उपस्थित होते.

विहिरीत पडलेल्या चिमुकलीला जीवाची पर्वा न करता वाचवले!

शिवसेना शेतकरी सेनेचे जिल्हाप्रमुख गजानन हेंबाडे पाटील यांचे धाडस

हिंगोली /गोपाळ सातपुते

हिंगोली : संकटाच्या प्रसंगी मदतीसाठी धावून जाणे हीच खरी माणुसकी असल्याचा प्रत्यय हिंगोली जिल्ह्यातील माळशेलू परिसरात आला. विहिरीत पडलेल्या दहा वर्षीय चिमुकलीला स्वतःचा जीव धोक्यात घालून सुखरूप बाहेर काढत शिवसेना शेतकरी सेनेचे जिल्हाप्रमुख गजानन हेंबाडे (पाटील) यांनी माणुसकीचे दर्शन घडवले.

मिळालेल्या माहितीनुसार, माळशेलू परिसरात शेतमजुरी करणाऱ्या संजय पवार यांची दहा वर्षीय मुलगी वैष्णवी ही पाणी आणण्यासाठी विहिरीवर गेली होती. पाणी भरत असताना



अचानक तिचा तोल गेल्याने ती खोल विहिरीत पडली. ही घटना लक्षात येताच परिसरात एकच खळबळ उडाली. मुलगी विहिरीत पडल्याचे पाहून आई-वडिलांनी मदतीसाठी आक्रोश केला.

याचवेळी हिंगोलीवरून आपल्या गावाकडे जात असलेले शिवसेना शेतकरी सेनेचे जिल्हाप्रमुख गजानन हेंबाडे पाटील हे त्या मार्गाने जात होते. विहिरीजवळील आरडाओरड आणि गोंधळ पाहून त्यांनी तात्काळ आपले वाहन थांबवले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून क्षणाचाही विलंब न करता त्यांनी खोल विहिरीत उडी घेतली आणि वैष्णवीला सुखरूप बाहेर काढले. त्यांच्या या धाडसी कृतीमुळे चिमुकलीचे प्राण वाचले.

आपली मुलगी सुखरूप बाहेर आल्याचे पाहताच वैष्णवीच्या आई-वडिलांना अश्रू अनावर झाले. "हेंबाडे पाटील देवासारखे धावून आले आणि त्यांनी आमच्या लेकीचा जीव वाचवला," अशा भावनिक शब्दांत त्यांनी गजानन हेंबाडे पाटील यांचे आभार मानले.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेल्या '८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण' या विचाराची प्रचीती या घटनेतून आल्याची भावना परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली. हेंबाडे पाटील यांच्या धाडसाचे आणि समयसूचकतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

वेताळवाडी-हळदा घाटातील गणपती मंदिराच्या मुर्तीचा चांदीचा मुकुट चोरणारा जेरबंद

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव दि.१२ नोंव्हेंबर

सोयगाव तालुक्यातील वेताळवाडी-हळदा घाटातील इच्छापूर्ती गणपती मंदिरातील गणपती मूर्तीचा चांदीचा मुकुट चोरणाऱ्या एका चोरास सोयगाव पोलीसांनी अवघ्या काही दिवसांतच जेरबंद केले आहे. त्याच्याकडून चोरीस गेलेला २१ हजार रुपये किमतीचा चांदीचा मुकुट जप्त करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ८ वाजेपासून ४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १.३० वाजेदरम्यान वेताळवाडी-हळदा घाटातील इच्छापूर्ती गणपती मंदिरातील गणपतीच्या मूर्तीचा सुमारे ७.५ भार वजनाचा चांदीचा मुकुट अज्ञात चोराने चोरून नेला होता.याप्रकरणी फिर्यादी





कृष्णा शहाजी भोसले (वय. ४६, रा.हळदा,ता. सिल्लोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सोयगाव पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस उपविभागीय अधिकारी विश्वजित काइंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे व त्यांच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय बातमीदारांच्या आधारे कसून तपास सुरू केला. तपासादरम्यान संशयित आरोपी आकाश पुंडलिक जाधव वय ३२, रा. हळदा, ता.सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर यास विश्वासात घेऊन कसून चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली.

त्यानुसार पोलीसांनी ९ नोव्हेंबर २०२६ रोजी आरोपीस अटक करून त्याच्याकडून चोरीस गेलेला २१,०००/- रुपये किमतीचा ७.५ भार वजनाचा चांदीचा मुकुट ज्याच्या मधोमध लाल रंगाचा खडा असून त्यावर शेंदूर लावलेला आहे यशस्वीरित्या जप्त केला आहे.

सदर धडक कारवाई सहाय्यक दिनकर गोरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस कर्मचारी सहाय्यक फौजदार इसरार मिर्झा,ज्ञानेश्वर दांडगे,नारायण जिरी,गजानन दांडगे,सादिक तडवी,राजेंद्र सोनवणे,शांताराम सपकाळ,पवन तायडे, कुणाल जाधव यांच्या पथकाने पार पाडली.

स्वच्छता कर्मचाऱ्यांचा भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्याकडून सन्मान



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

जालना : दीपावली सणाचे औचित्य साधून भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या वतीने चित्रकूट निवास येथे जालना महानगरपालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी कर्मचाऱ्यांना भेटवस्तू व मिठाई देऊन दीपावलीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी स्वच्छता कर्मचारी अहोरात्र मेहनत घेत असतात. त्यांच्या परिश्रमामुळेच शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत राहण्यास मदत होते. या कर्मचाऱ्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी भास्कर आबा दानवे यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या कामाचे कौतुक केले. या प्रसंगी नगरसेविका सुशीला दानवे, नगरसेवक सिद्धिविनायक मुळे, भाजपा सरचिटणीस सुनील पवार, दत्ता जाधव यांच्यासह महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

दुष्काळाच्या संकटात दिवाळीपूर्वीची पाच हजारांची मदत ठरली शेतकऱ्यांना दिलासा!

परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी राज्य शासनाप्रती व्यक्त केली कृतज्ञता

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : अल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे निर्माण झालेली प्रतिकूल हवामान परिस्थिती, पावसातील अनियमितता आणि खरीप हंगामातील दुष्काळी संकटामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना दिवाळीपूर्वी मिळालेली पाच हजार रुपयांची अग्रिम आर्थिक मदत जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरली आहे. सणासुदीच्या काळात हातात आलेल्या या मदतीमुळे शेतकऱ्यांना दैनंदिन गरजा, किराणा आदी तातडीच्या गरजा भागविण्यास हातभार लागला आहे. परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या मदतीबद्दल राज्य शासनाप्रती आभार आणि कृतज्ञता व्यक्त केली आहे.

दुष्काळी परिस्थितीमुळे यंदाचा खरीप हंगाम अनेक शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या आव्हानात्मक ठरला. पावसाची अनियमितता, पिकांच्या उत्पादनातील घट, वाढता शेतीखर्च आणि आगामी रब्बी हंगामाची तयारी अशा अनेक प्रश्नांमुळे शेतकरी आर्थिक विवंचनेत होते. अशा परिस्थितीत राज्य शासनाने दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रिम मदत देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट डीबीटीद्वारे मदत जमा करण्यात आली. ही रक्कम मोठ्या आर्थिक नुकसानीची पूर्ण भरपाई नसली, तरी ऐन सणासुदीच्या काळात मिळालेला आर्थिक आधार म्हणून शेतकऱ्यांनी स्वागत केले आहे.

परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागात या मदतीबाबत शेतकऱ्यांनी समाधानाची भावना व्यक्त केली असून, अनेक शेतकरी कुटुंबांसाठी दिवाळीचा सण साजरा करण्यासाठी, घरातील आवश्यक वस्तूंची खरेदी करण्यासाठी तसेच दैनंदिन खर्च भागविण्यासाठी ही रक्कम उपयोगी ठरली. शेतीतील संकटाच्या काळात शासनाने मदतीचा हात दिल्याची भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत.

परभणी जिल्ह्यासाठी या अग्रिम मदतीचे महत्त्व विशेष आहे. उपलब्ध वितरणाच्या आकडेवारीनुसार, जिल्ह्यातील 3 लाख 36 हजार 380 शेतकऱ्यांच्या खात्यांवर एकूण 168 कोटी 19 लाख रुपये जमा झाले आहेत. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची तीव्रता लक्षात घेता परभणीसह संपूर्ण विभागात या मदतीचा मोठा लाभ झाला आहे.

राज्य मंत्रिमंडळाने ३०४ दुष्काळग्रस्त तालुक्यांतील 33 टक्क्यांपेक्षा अधिक पीक नुकसान झालेल्या पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपये अग्रिम देण्यास मान्यता दिली होती. यासाठी शासनाने ७ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद केली.

या निर्णयाची अंमलबजावणी करताना महसूल, कृषी तसेच मदत व पुनर्वसन विभागाच्या यंत्रणेने लाभार्थ्यांची माहिती संकलित करून मदत वितरणाची प्रक्रिया राबविली. तांत्रिक कारणांमुळे काही शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होण्यास विलंब झाला असला, तरी अशा त्रुटी दूर करून उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही मदत देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

परभणी तालुक्यातील वाडी दमई येथील शेतकरी पंढरी उत्तमराव बारहाते असून, या शेतकऱ्याच्या बँक खात्यावर 5 हजार रुपये अग्रीम जमा झाल्यामुळे त्यांनी समाधानी असल्याचे सांगितले आहे. तसेच ही समाधानकारक मदत असून, या मदतीमुळे त्यांनी राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. नैसर्गिक आपत्ती, पावसाचे अनिश्चित चक्र आणि बाजारपेठेतील चढ-उतार यांचा सर्वाधिक परिणाम शेतकरी कुटुंबांवर होत असतो. अशा वेळी शासनाकडून मिळणारा आर्थिक आधार त्यांच्यासाठी महत्त्वाचा ठरतो आहे, असे सांगून झरी येथील गजानन मोहनराव चव्हाण यांनी राज्य शासनाने राज्य शासनाने दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत केली आहे. ती मोलाची आहे. त्यामुळे त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य शासनाचे मनस्वी आभार मानले आहेत.

परभणी जिल्ह्यातील सोरजा (ता. जिंतूर) येथील नामदेव कवडे यांनी यंदा अल निनोमुळे पुरेसा पाऊस न झाल्यामुळे शेतीपिकाचे मोठे नुकसान झाले आहे. असे सांगून ऐन दिवाळी सणापूर्वी राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यावर पाच हजार रुपये पाठविले. त्यामुळे मोठी मदत झाली असल्याचे सांगून या शेतकऱ्याने दिवाळीपूर्वी खात्यात जमा झालेल्या या मदतीबद्दल राज्य शासनाचे आभार मानले आहेत. संकटाच्या काळात शासनाने शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन मदत उपलब्ध करून दिली, ही समाधानाची बाब असल्याची भावना श्री. कवडे यांनी व्यक्त केली आहे.

पाच हजार रुपयांची अग्रिम मदत ही तात्पुरता दिलासा देणारी असली, तरी दुष्काळी परिस्थितीतून शेतकऱ्यांना कायमस्वरूपी बाहेर काढण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची गरज आहे. पीक नुकसान भरपाई, पीक विमा, कर्जविषयक सवलती, सिंचन सुविधा, पाणी व्यवस्थापन, जनावरांसाठी चारा उपलब्धता आणि रब्बी हंगामासाठी आवश्यक मदत अशा उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याची अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

शासनाने दिवाळीपूर्वी केलेली पाच हजार रुपयांची अग्रिम मदत ही केवळ आर्थिक मदत नसून, संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन उभे असल्याचा दिलासा देणारी बाब ठरली आहे. दुष्काळाच्या सावटाखाली असलेल्या परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी ही मदत दिवाळीच्या आनंदात भर घालणारी ठरली असून, त्यातून शासनाप्रती कृतज्ञतेची भावना व्यक्त होत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

एमजीएमच्या माजी विद्यार्थ्यांची सामाजिक बांधिलकी; गरजूंना दीड लाखांची दिवाळी भेट

50 शेतकरी कुटुंबांना किराणा साहित्य; गोशाळा, अनाथाश्रम आणि वृद्धाश्रमालाही मदतीचा हात

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर दिवाळीचा आनंद समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या मित्रपरिवाराने सामाजिक बांधिलकी जपत 'आशीर्वादाची दिवाळी' हा उपक्रम राबविला. या उपक्रमासाठी अवघ्या आठ ते दहा तासांत १ लाख ५७ हजार ८१३ रुपयांचा निधी संकलित झाला. या माध्यमातून बीड जिल्ह्यातील ५० गरजू शेतकरी कुटुंबांना किराणा साहित्य, गोशाळेतील जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था, अनाथ मुलांसाठी मदत आणि वृद्धाश्रमासाठी जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देण्यात आल्या.

एमजीएम विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा. डॉ. रवींद्र देशमुख यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. राज्यातील दुष्काळी परिस्थिती, पावसाअभावी पिकांचे झालेले नुकसान आणि आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकरी कुटुंबांची परिस्थिती लक्षात घेऊन दिवाळीच्या काळात त्यांना मदत करण्याचा विचार पुढे आला. आसरडोह (ता. धारूर, जि. बीड) येथील सामाजिक कार्यकर्ते रविकिरण देशमुख यांनी तेथील परिस्थितीची माहिती देत मदतीचे आवाहन केले. त्यानंतर प्रा. डॉ. देशमुख यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील माजी स्वयंसेवक, विद्यार्थी आणि वर्गमित्रांना मदतीसाठी आवाहन केले.

या आवाहनाला स्वप्नील भुईंगडे, अक्षय कोलते, सुप्रिया, सतीश दरगड आणि प्रा. अजय खके यांनीही प्रतिसाद देत पुढाकार घेतला. समाजमाध्यमे आणि वैयक्तिक संपर्कातून करण्यात आलेल्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अवघ्या आठ ते दहा तासांत दीड लाखांहून अधिक निधी जमा झाला.

संकलित निधीतून आसरडोह येथील ५० गरजू शेतकरी कुटुंबांना प्रत्येकी दोन हजार रुपये किमतीचे किराणा साहित्य देण्यात आले. यामध्ये दिवाळीचे गोड पदार्थ तयार करण्यासाठी लागणारे साहित्य तसेच पुढील सुमारे २० दिवस पुरेल अशा दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा समावेश होता. यासाठी एक लाख रुपये खर्च करण्यात आले. अंबाजोगाई येथील पावनी गोशाळेला ३० हजार रुपयांची मदत देण्यात आली. परिसरातील पाणीटंचाईमुळे जनावरांच्या चारा आणि पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्याने या मदतीतून मुक्या जनावरांसाठी व्यवस्था करण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर येथील भगवानबाबा बालिकाश्रमातील अनाथ मुला-मुलींसाठी २५ हजार ८१३ रुपयांचे किराणा साहित्य उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच मलेशिया येथे स्थायिक असलेले एमजीएमचे माजी विद्यार्थी गिरीश कुलकर्णी यांनी स्वतःहून तेल, तांदूळ आणि पीठ यांसारखे जीवनावश्यक साहित्य दिले असून, ते मातोश्री वृद्धाश्रमात वितरित करण्यात येणार आहे. वडिलांच्या निधनाचे दुःख असतानाही मनीष जाजू यांनी पाच हजार रुपयांची मदत देण्याची तयारी दर्शविली. परदेशात वास्तव्यास असलेल्या मित्रांनीही या उपक्रमाला सहकार्य केले.

'विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हीच खरी पावती'

एमजीएम संस्थेने आम्हाला सामाजिक बांधिलकीचे संस्कार दिले आहेत. कुलपती अंकुशराव कदम, प्राचार्य प्रताप बोराडे, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, माजी प्राचार्य डॉ. सुधीर देशमुख आणि प्राचार्या डॉ. विजया मुसांडे यांचे मार्गदर्शन व सहकार्य या उपक्रमासाठी प्रेरणादायी ठरले. आसरडोह येथे शेतकरी कुटुंबांना साहित्याचे वाटप करताना त्यांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि डोळ्यांतील आनंद हीच आमच्या प्रयत्नांची खरी पावती होती. माजी विद्यार्थी, मित्रपरिवार आणि सहकाऱ्यांच्या सहकार्यामुळे शेतकरी, अनाथ मुले, वृद्ध आणि मुक्या जनावरांपर्यंत मदतीचा हात पोहोचवता आला. मिळालेले आशीर्वाद आणि चेहऱ्यावरील हास्य यामुळे यंदाची दिवाळी खऱ्या अर्थाने 'आशीर्वादाची दिवाळी' ठरली.

— प्रा. डॉ. रवींद्र देशमुख

भाऊबीजेनिमित्त वडगाव कोल्हाटीतील विद्यार्थिनींना पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते सायकलींचे वाटप



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : 'दिवाळी आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत भाऊबीजेनिमित्त वडगाव कोल्हाटी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनींना पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते सायकलींचे वितरण करण्यात आले.

ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना शाळेत ये-जा करताना होणारा त्रास कमी व्हावा, प्रवासाचा वेळ वाचून त्यांना अभ्यासासाठी अधिक वेळ मिळावा आणि शिक्षणात सातत्य राहावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

सायकलींचा वापर करून विद्यार्थिनींनी शाळेत येण्या-जाण्याचा वेळ वाचवावा आणि तो वेळ अभ्यासासाठी द्यावा. मन लावून शिक्षण घेत उच्च शिक्षणापर्यंत मजल मारावी, असे आवाहन पालकमंत्री शिरसाट यांनी केले. विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर आपले, कुटुंबाचे तसेच देशाचे नाव उज्ज्वल करावे. आजचे विद्यार्थी हेच उद्याच्या विकसित भारताचे शिल्पकार आहेत, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित विद्यार्थिनींनी मान्यवरांचे औक्षण करून पारंपरिक पद्धतीने स्वागत केले. सायकली मिळाल्याने विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. यावेळी पालकमंत्री शिरसाट यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

याप्रसंगी सरपंच सुनील काळे, पंचायत समितीचे उपसभापती बाळासाहेब गाढे, पंचायत समिती सदस्य मोहिनी ढमढरे, स्वप्नील अडसूळ, योगेश साळे, रमेश पाटील, संतोषसिंग ठाकूर, माजी महापौर नंदकुमार घोडेले, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक बाळासाहेब गाढे यांनी केले. सूत्रसंचालन शिक्षक राहुल मांडे यांनी केले, तर महेंद्र बारवाल यांनी आभार मानले.

बीड बायपासवरील पाणीप्रश्न सुटण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल; रोड क्रॉसिंग पाइपलाइनचे काम सुरू

निशांत हॉटेल ते रेल्वे पटरी परिसरातील नागरिकांना लवकरच दिलासा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : बीड बायपासवरील निशांत हॉटेल ते रेल्वे पटरीदरम्यान असलेल्या त्रिभुवनेश्वर मंदिर परिसर, सेनानगर, पीडब्ल्यूडी कॉलनी आणि राजगुरुनगर येथील पाणीप्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. या भागातील पाण्याच्या टाकीला बीड बायपासवरून पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेल्या रोड क्रॉसिंग पाइपलाइनच्या कामाला भाऊबीजेच्या दिवशी सुरुवात झाली. भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे काम सुरू झाले असून, परिसरातील नागरिकांना लवकरच दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

संबंधित परिसरातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी उभारण्यात आलेली पाण्याची टाकी लवकरात लवकर कार्यान्वित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी आवश्यक असलेल्या कामांचा संबंधित यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. कंत्राटदाराकडे मनुष्यबळाची कमतरता असल्याने कामाला अपेक्षित गती मिळत नसली, तरी उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली या कामासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. रोड क्रॉसिंग पाइपलाइनचे काम पूर्ण झाल्यानंतर पाण्याच्या टाकीला पाणीपुरवठा करणे शक्य होणार आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना नळाद्वारे नियमित पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

या कामासाठी भाजपचे नगरसेवक शोभाताई बुरांडे, सविता कुलकर्णी, चंद्रकांत हीवराळे, आप्पासाहेब हीवाळे, पदम राजपूत, प्रदीप बुरांडे आणि विशाल थोरात हेदेखील किशोर शितोळे यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने पाठपुरावा करीत आहेत.

किशोर शितोळे म्हणाले, या परिसरातील नागरिकांचा पाणीप्रश्न सोडविणे हे आमचे प्राधान्य आहे. पाण्याच्या टाकीला पाणीपुरवठा करणाऱ्या पाइपलाइनच्या रोड क्रॉसिंगचे काम सुरू झाल्याने महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. उर्वरित कामेही लवकर पूर्ण करून पाण्याची टाकी कार्यान्वित करण्यासाठी पाठपुरावा सुरूच राहील.

भाऊबीजेच्या दिवशी पाइपलाइनच्या कामाला सुरुवात झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला पाणीप्रश्न लवकरच सुटेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

जायकवाडी डावा कालवा लाभक्षेत्रातील; शेतकऱ्यांनी पाणीपाळीसाठी अर्ज करा

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी : जायकवाडी प्रकल्पाच्या पैठण डाव्या कालव्याच्या 122 ते 208 किमीपर्यंत मुख्य कालवा व त्यावरील सर्व वितरण प्रणाली, तसेच कालव्यावरील मंजूर उपसा सिंचन योजना धारकांनी रब्बी हंगामातील पिकांना पाणी मिळविण्याकरिता 26 नोव्हेंबरपर्यंत संबंधित शाखा कार्यालयात पाणी मागणी अर्ज करावेत, असे आवाहन जलसंपदा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

एल निनोमुळे उद्भवलेल्या संभाव्य टंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी प्रथम प्राधान्याने अन्नधान्य व चारा पिकांची लागवड करावी. जायकवाडी प्रकल्पांतर्गत सर्व लाभधारकांनी पाणी वापराबाबत आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन जलसंपदा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

जायकवाडी प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठ्यानुसार रब्बी हंगामात तीन पाणीपाळ्या देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, इतर अन्नधान्य तसेच चारा पिकांसाठी 15 ऑक्टोबर 2026 ते 28 फेब्रुवारी 2027 या कालावधीत कालव्याद्वारे तसेच मंजूर उपसा सिंचन योजनांद्वारे पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पाणी मागणी अर्ज नमुना क्रमांक 7 व 7-अमध्ये भरून संबंधित शाखा कार्यालयात सादर करावेत. हे अर्ज शाखा कार्यालयात विनामूल्य उपलब्ध आहेत. प्राप्त मागणी क्षेत्रानुसार कालवा संचलन कार्यक्रम निश्चित करण्यात येणार आहे.

पाणी अर्ज मंजूर होण्यासाठी लाभधारकांनी मागील संपूर्ण थकबाकी व चालू हंगामातील पिकांची अग्रीम पाणीपट्टी भरणे आवश्यक आहे. अर्जासोबत अपत्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच अल्प व अत्यल्प भूधारक असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. प्रमाणपत्र सादर न केल्यास शासनाच्या तरतुदीनुसार मिळणाऱ्या सवलती व प्रोत्साहनांचा लाभ मिळणार नाही तसेच दंडात्मक कार्यवाही होऊ शकते. पिकांचे मागणी क्षेत्र 20 आरच्या पटीत असणे आवश्यक आहे.

मंजूर उपसा सिंचन योजना धारकांनी कालवा उपसा अथवा नदी-नाल्यांवरील उपसा सिंचनासाठी पाणी अर्ज मंजूर करून घेणे आवश्यक असून, अर्जासोबत उपसा सिंचन परवानगीची प्रत जोडावी. पाणीपट्टी न भरणाऱ्या लाभधारकांना सिंचनासाठी पाणी देणे कार्यालयावर बंधनकारक राहणार नाही. अशा लाभधारकांचा पाणीपुरवठा कोणत्याही वेळी बंद करण्यात येऊ शकतो. शासन निर्णय व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांच्या आदेशानुसार ठोक जलदरासह संबंधित सर्व अटी व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. याबाबतचा सविस्तर तपशील सिंचन शाखा कार्यालयात उपलब्ध आहे.

कालव्याचे पाणी शेतात नेण्यासाठी असलेली शेतचारी स्वच्छ व व्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी संबंधित लाभधारकांची राहील. उडाप्याच्या क्षेत्रास पाणीपुरवठा करण्यात येणार नाही. महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ मधील तरतुदीनुसार नैसर्गिक किंवा तांत्रिक कारणांमुळे पाणीपुरवठा करणे शक्य न झाल्यास व त्यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी कार्यालयावर राहणार नाही.

जायकवाडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्याच्या 122 ते 208 किमीपर्यंत व त्याअंतर्गत वितरण व्यवस्थेद्वारे सुलभपणे पाणी पोहोचविणे शक्य आहे, तेथील लाभधारकांनी प्रत्येक पाणीपाळीच्या कालवा संचलन नियमांचे पालन करावे. कालव्याच्या काही ठिकाणी फुटतूट झालेली असून, तिची दुरुस्ती शक्य न झाल्यास संबंधित क्षेत्रातील लाभधारकांना सिंचनासाठी पाणी देणे शक्य होणार नाही. लाभधारकांनी दिवस व रात्र अशा दोन्ही वेळेत पाणी घेणे बंधनकारक राहील.

पाणी वापर संस्थांनी मागील थकबाकी व अग्रीम पाणीपट्टी भरून प्रत्येक पाणीपाळीपूर्वी पाण्याची मागणी करावी. काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास पूर्वसूचना न देता पाणीपाळी पत्रकात बदल करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंत्यांना राहतील.

रोहित पठारे हत्याकांडाचा खटला जलदगती न्यायालयात चालवा; डॉ. भीमराव हत्तीअंबीरे यांची मागणी

पीडित कुटुंबीयांची भेट घेऊन केले सांत्वन; एसआयटी नेमण्यासह पुनर्वसनाचीही मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : वैजापूर येथील रोहित पठारे हत्याकांड प्रकरणातील पीडित कुटुंबीयांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा प्रवक्ते डॉ. भीमराव हत्तीअंबीरे यांनी भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी त्यांनी कुटुंबीयांकडून घटनेची सविस्तर माहिती घेतली तसेच वैयक्तिक स्वरूपात आर्थिक मदत केली. या प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी खटला जलदगती न्यायालयात चालविण्याची मागणी त्यांनी शासन आणि प्रशासनाकडे केली.

या प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथकाची (एसआयटी) नियुक्ती करावी, तसेच सरकारी पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी विशेष सरकारी वकिलांची नेमणूक करावी, अशी मागणी डॉ. हत्तीअंबीरे यांनी केली. पीडित कुटुंबाला शासनाकडून तातडीने आर्थिक मदत द्यावी. तसेच कुटुंबाचे सध्याचे घर एकाकी ठिकाणी असल्याने त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बौद्ध वस्तीत नवीन घर बांधून द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

यावेळी बोलताना डॉ. हत्तीअंबीरे यांनी भाजपा सरकारच्या काळात अनुसूचित जातींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचा आरोप केला. पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी पक्षाच्या माध्यमातून या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी माजी राज्य सचिव संदेश कांबळे, तालुकाध्यक्ष प्रकाश बापू ठुबे, जिल्हाध्यक्ष उद्धव बनसोडे, सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष रतन पगारे, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष अकबर भाई शेख, तालुका उपाध्यक्ष नारायण पवार, युवक शहर उपाध्यक्ष कमलेश नरवडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

बागायती पिकांच्या संशोधन व bतंत्रज्ञान विकासासाठी वनामकृवि आणि राष्ट्रीय बागवानी अनुसंधान आणि विकास प्रतिष्ठान यांच्यात सामंजस्य करार

करारावर वनामकृविचे कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि आणि प्रतिष्ठानचे संचालक डॉ. पी. के. गुप्ता यांनी स्वाक्षऱ्या केल्या

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी



परभणी**कांदा व लसूण पिकांच्या उत्पादनवाढीसह आधुनिक साठवणूक, काढणीपश्चात तंत्रज्ञान आणि संशोधनाला मिळणार चालना

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी आणि राष्ट्रीय बागवानी अनुसंधान आणि विकास प्रतिष्ठान (National Horticultural Research and Development Foundation – NHRDF), नवी दिल्ली यांच्यात बागायती पिकांच्या संशोधन, तंत्रज्ञान विकास तसेच विस्तार कार्याला अधिक बळकटी देण्याच्या उद्देशाने दिनांक ११ नोव्हेंबर २०२६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर वनामकृविचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि आणि राष्ट्रीय बागवानी अनुसंधान आणि विकास प्रतिष्ठानचे संचालक डॉ. पी. के. गुप्ता यांनी स्वाक्षऱ्या केल्या. सदर सामंजस्य कराराची अंमलबजावणी सन २०२६ च्या रब्बी हंगामापासून सुरू होणार असून, त्याअंतर्गत प्रस्तावित संशोधन प्रकल्प, तंत्रज्ञान विकास आणि इतर अनुषंगिक उपक्रम प्रत्यक्षात राबविण्यात येणार आहेत.

या सामंजस्य करारामुळे दोन्ही संस्थांमधील संशोधन व विस्तार कार्यातील परस्पर सहकार्य अधिक दृढ होणार असून, विशेषतः कांदा व लसूण या महत्त्वाच्या बागायती पिकांच्या उत्पादनवाढीसाठी, सुधारित वाणांच्या विकासासाठी तसेच काढणीपश्चात तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी संयुक्त प्रयत्न करण्यात येणार आहेत.

या करारांतर्गत गरजेनुसार संशोधन कार्यक्रमांची आखणी करून बागायती पिकांच्या नवीन वाणांचा विकास, उत्पादन तंत्रज्ञान आणि काढणीपश्चात तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. राष्ट्रीय बागवानी अनुसंधान आणि विकास प्रतिष्ठानने विकसित केलेल्या कांद्याच्या प्रगत व आशादायी वाणांचे महाराष्ट्र राज्यातील लागवडीसाठी मूल्यमापन करण्यात येणार आहे. तसेच कांदा साठवणुकीच्या आधुनिक संरचनांमध्ये सुधारणा करून ऊर्जा वापर कमी करण्यासंदर्भात संशोधन केले जाणार आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या कांद्याच्या वाणांचे तसेच कांदा बियाणे पेरणी व रोपलागवडीसाठी विकसित केलेल्या कृषि अवजारांचे इतर कांदा उत्पादक राज्यांमध्ये मूल्यमापन व प्रमाणीकरण करण्यासाठी NHRDF सहकार्य करणार आहे. याशिवाय केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून संयुक्त संशोधन, प्रशिक्षण, प्रात्यक्षिके आणि विकसित तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांपर्यंत प्रसार करण्याचे नियोजन आहे.

या सहकार्यातून दोन्ही संस्थांतील शास्त्रज्ञ, संशोधक व प्राध्यापकांना संशोधन आणि प्रशिक्षण सुविधांचा परस्पर लाभ घेता येणार असून, वैज्ञानिक माहिती, प्रयोगांचे निष्कर्ष, तांत्रिक माहिती आणि विकसित तंत्रज्ञानाची देवाणघेवाण करण्यात येणार आहे. सामंजस्य कराराच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक यांच्या अध्यक्षतेखाली पुनरावलोकन व अंमलबजावणी समिती स्थापन करण्यात येणार आहे. या कराराचा कालावधी पाच वर्षांचा राहणार आहे.

या सामंजस्य करारामुळे बागायती पिकांच्या संशोधनाला नवी दिशा मिळण्यासोबतच कांदा व लसूण उत्पादक शेतकऱ्यांसाठी आधुनिक उत्पादन तंत्रज्ञान, सुधारित वाण, कार्यक्षम साठवणूक व्यवस्था आणि काढणीपश्चात तंत्रज्ञान उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

भाऊबीजेनिमित्त आमदार संजय केणेकर यांच्या पुढाकारातून एकल भगिनींना शिधावाटप

एकल महिला महासंघाचा सामाजिक बांधिलकीतून उपक्रम

हिंदू प्रकाशवार्ता: प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : भाऊबीज सणाचे औचित्य साधून समाजातील गरजू व एकल महिलांनाही दिवाळीचा आनंद घेता यावा, या उद्देशाने आमदार संजय केणेकर यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून एकल महिला महासंघाच्या वतीने शिधावाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून एकल भगिनींना शिध्याचे वाटप करण्यात आले.

सणासुदीच्या काळात गरजू महिलांना आधार मिळावा आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. शिधावाटपाच्या माध्यमातून एकल भगिनींच्या सुख-दुःखात सहभागी असल्याचा विश्वास देण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमाला मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई येथील मुख्यमंत्री लोककल्याण अभियान योजना कक्षाचे प्रशासकीय अधिकारी तथा कक्षप्रमुख अनिल घुगे, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, निवृत्त शिक्षणाधिकारी तथा पदवीधर मराठवाडा सहनोंदणी प्रमुख एम. के. देशमुख, भाजप प्रणित कोचिंग क्लासेस प्रकोष्ठाचे माजी प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. पांडुरंग मांडकीकर, भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या सदस्या डॉ. उज्वलाताई दहिफळे, नगरसेविका तथा भाजपच्या शहर जिल्हा सरचिटणीस छायाताई खाजेकर, नगरसेवक रामेश्वर भादवे आणि भाजपचे शहर उपाध्यक्ष दीपक ढाकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

एकल महिला महासंघाच्या सदस्या कल्पना निकम, अरुणा डकले, अश्विनी ढगे, कल्पना जाधव यांच्यासह महासंघाच्या इतर सदस्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने भगिनी उपस्थित होत्या.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911